# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी
## संगणक विभाग

**प्रस्तावना:-**

**विषय:-**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका शाळा क्र. ३४, अवचितपाडा या शाळेसाठी डिजीटज शिक्षणासाठी "Futuristic Classroom" (Astronomy Experience Centre) तयार करणेबाबत ...

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका शाळा क्र. ३४, अवचितपाडा या शाळेसाठी डिजीटज शिक्षणासाठी "Futuristic Classroom" (Astronomy Experience Centre) तयार करणेबाबत रक्कम रु. ५९,००,०००/- मात्रच्या प्रस्तावास नियंत्रक व उप आयुक्त(संगणक), मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति. आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा. आयुक्त महोदय यांनी त्यास मान्यता दिलेली आहे. शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र. क्र. ७१(भाग-२)नवि १४, दि. ०६ जून २०२२ रोजी नुसार मा. महासभा व स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यात आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा कार्यभार प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतुदीनुसार उपरोक्त खर्चास महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ (क) नुसार आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेकामी सविनय सादर.

ठराव क्र. ५७८ दिनांक:- २४/०९/२०२४

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका शाळा क्र. ३४, अवचितपाडा या शाळेसाठी डिजीटज शिक्षणासाठी "Futuristic Classroom" (Astronomy Experience Centre) तयार करणेबाबत रक्कम रु. ५९,००,०००/- मात्रच्या प्रस्तावास नियंत्रक व उप आयुक्त (संगणक), मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति. आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र. क्र. ७१ (भाग-२) नवि-१४, दिनांक ०६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधिल तरतुदींच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी., भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका शाळा क्र. ३४, अवचितपाडा या शाळेसाठी डिजीटज शिक्षणासाठी "Futuristic Classroom" (Astronomy Experience Centre) तयार करणेबाबत रक्कम रु. ५९,००,०००/- मात्रच्या खर्चास प्रशासकीय ठरावाद्वारे मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका

०१८

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी
संगणक विभाग

प्रस्तावना:-

विषय:- भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका शाळा क्र. ३४, अवचितपाडा या शाळेसाठी डिजीटज शिक्षणासाठी "Futuristic Classroom" (Astronomy Experiance Centre) तयार करणेबाबत ...

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका शाळा क्र. ३४, अवचितपाडा या शाळेसाठी डिजीटज शिक्षणासाठी "Futuristic Classroom" (Astronomy Experience Centre) तयार करणेबाबत रक्कम रु. ५९,००,०००/-मात्रच्या प्रस्तावास नियंत्रक व उप आयुक्त(संगणक), मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति. आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा. आयुक्त महोदय यांनी त्यास मान्यता दिलेली आहे. शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र. क्र. ७१(भाग-२)नवि १४, दि. ०६ जून २०२२ रोजी नुसार मा. महासभा व स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यात आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा कार्यभार प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतुदीनुसार प्रशासकीय ठराव व निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक सो. यांना आहेत. विषयांकित कामाकरिता ई निविदेद्वारे राबविणेत आलेल्या निविदा प्रक्रियेत M/s. Eduneeds,Pune,Walvekar Nagar, Plot No 53/5, Vaishnukamal Bldg., Sant Nagar Rd., Aranyeshwar, Pune यांची रक्कम रु. ५३,०५,७५२/- मात्रची न्युनतम निविदा असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३-क नुसार सदर निविदाकारासह संविदा करणेस मान्यता मिळणेकामी सादर.

ठराव क्र. ५७८ दिनांक:- २४/०९/२०२४

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका शाळा क्र. ३४, अवचितपाडा या शाळेसाठी डिजीटज शिक्षणासाठी "Futuristic Classroom" (Astronomy Experience Centre) तयार करणेबाबत रक्कम रु. ५९,००,०००/-मात्रच्या प्रस्तावास नियंत्रक व उप आयुक्त (संगणक), मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति. आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र. क्र. ७१ (भाग-२) नवि-१४, दिनांक ०६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधिल तरतुदींच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी. विषयांकित कामाकरिता ई निविदेद्वारे राबविणेत आलेल्या निविदा प्रक्रियेत M/s. Eduneeds,Pune,Walvekar Nagar, Plot No 53/5, Vaishnukamal Bldg., Sant Nagar Rd., Aranyeshwar, Pune यांची रक्कम रु. ५३,०५,७५२/- मात्रची न्युनतम निविदा असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३-क नुसार सदर निविदाकारासह संविदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी

**विषय :- महानगरपालिकेच्या सन २०२२-२३ च्या प्रशासकिय अहवालास मान्यता मिळणेबाबत.**

**संदर्भ :- १. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४.**
**२. आपले सरकार पोर्टलवरील रामदास दानवे यांची तक्रार.**

**प्रस्तावना**

सादर करण्यात येत आहे की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम **१९४९** चे कलम **९४** नुसार एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेनंतर लवकरात लवकर मागील सरकारी वर्षातील प्रशासनाव्यतिरीक्त शहरातील नगरपालिकेच्या अन्य प्रशासनासंबंधी तपशिलवार अहवाल व उक्त वर्षात नगरपालिका निधीच्या खाती जमा झालेल्या व संवितरित केलेल्या रकमा व अशा वर्षाच्या अखेरीस निधीत जमा असलेली शिल्लक दर्शवणाऱ्या विवरणपत्रासहित तयार करुन स्थायी समितीस सादर केला पाहिजे, असा अहवाल स्थायी समिती वेळोवेळी निर्देश देईल अशा नमुन्यात असेल व त्यात स्थायी समिती वेळोवेळी निर्देश देईल अशी माहिती समाविष्ट असेल. स्थायी समितीने अहवालाची व विवरणपत्राची तपासणी व त्यांचा आढावा घेतल्यानंतर त्यांची छापील प्रत प्रत्येक पालिका सदस्याला पाठविली पाहीजे व त्याच्या प्रती आयुक्त ठरवतील त्या किंमतीस विक्रीसाठी महानगरपालिका कार्यालयात ठेवल्या पाहीजेत, असे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमात नमुद करण्यात आलेले आहे. त्यानुसार भिवंडी महानगरपालिकेच्या प्रशासकिय अहवाल तयार करणे आवश्यक आहे. मनपाचा वार्षिक प्रशासकिय अहवाल तयार करुन प्रसिध्द केला जात नसल्याने आपले सरकार पोर्टलवरील रामदास दानवे यांनी महानगरपालिकेच्या प्रशासकिय अहवालाबाबत तक्रार दाखल केलेली आहे.

त्या अनुषंगाने भिवंडी महानगरपालिकेचा सन **२०२२-२३** या आर्थिक वर्षाचा प्रशासकिय अहवाल तयार करण्यात आलेला आहे. सद्यपरिस्थितीत महानगरपालिकेची स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम **१९४९** चे कलम **४५२** अ (१) नुसार मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांचे अधिकारात मान्यता घेऊन मा.प्रशासक यांचा ठराव करणेकामी सादर करण्यात येत आहे. तरी सन **२०२२-२३** या आर्थिक वर्षाच्या प्रशासकिय अहवाल मान्य असल्यास स्वाक्षरीस्तव व मा.प्रशासक यांचा ठराव घेणेकामी सविनय सादर.

**ठराव क्रमांक :-** ५७९ **दिनांक :-** 28/09/२०२४

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ नुसार एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेनंतर लवकरात लवकर मागील सरकारी वर्षातील प्रशासनाव्यतिरीक्त शहरातील नगरपालिकेच्या अन्य प्रशासनासंबंधी तपशिलवार अहवाल व उक्त वर्षात नगरपालिका निधीच्या खाती जमा झालेल्या व संवितरित केलेल्या रकमा व अशा वर्षाच्या अखेरीस निधीत जमा असलेली शिल्लक दर्शवणाऱ्या विवरणपत्रासहित तयार करुन स्थायी समितीस सादर केला पाहिजे, असा अहवाल स्थायी समिती वेळोवेळी निर्देश देईल अशा नमुन्यात असेल व त्यात स्थायी समिती वेळोवेळी निर्देश देईल अशी माहिती समाविष्ट असेल. स्थायी समितीने अहवालाची व विवरणपत्राची तपासणी व त्यांचा आढावा घेतल्यानंतर त्यांची छापील प्रत प्रत्येक पालिका सदस्याला पाठविली पाहीजे व त्याच्या प्रती आयुक्त ठरवतील त्या किंमतीस विक्रीसाठी महानगरपालिका कार्यालयात ठेवल्या पाहीजेत, असे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमात**

नमुद करण्यात आलेले आहे. त्यानुसार भिवंडी महानगरपालिकेचा सन २०२२-२३ प्रशासकिय अहवाल तयार करणे आवश्यक आहे.

मला प्राप्त महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ२०२०/प्र.क्र.७१(भाग-२) नवि.१४, दि.०६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेष कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, सहायक आयुक्त (प्रशासन), उपायुक्त (मुख्यालय) व अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार उपरोक्त भिवंडी महानगरपालिकेचा सन २०२२-२३ प्रशासकिय अहवालास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका